**दिनांक १७.०२.२०२२ रोजीचे सर्वसाधारण सभेत पारित करण्यात आलेला तसेच त्याच सभेत कायम करण्यात आलेल्या ठरावाचा उतारा**

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक १५ :-** श्री. प्रविण उत्तम राठोड, फायरमन, मनपा, अमरावती यांना पती-पत्नी एकत्रीकरण अंतर्गत नागपुर महानगरपालिका, येथे बदली मिळणे बाबत.

**ठराव क्रमांक १५ :-** श्री. प्रविण उत्तम राठोड, हे मनपा, अमरावती आस्थापनेवर आदेश नियुक्ती दिनांक २०/१०/२०१५ खुला प्रवर्गात फायरमन या पदावर कार्यरत आहे. त्यांची पत्नी अधिक्षक अभियंता पाठबंधारे विभाग नागपुर येथे दप्तर कारकुन या पदावर कार्यरत आहे. श्री. राठोड यांनी पती- पत्नी एकत्रीकरण अंतर्गत नागपुर महानगरपालिका, येथे बदली बाबत सदर अर्जाचे अनुषंगाने उपायुक्त (साप्रवि), महानगरपालिका, नागपुर यांनी श्री. राठोड, यांना फायरमन पदावर सामावून घेण्यास हरकत नाही. असे पत्र क्र.४०/ आस्थापना दिनांक ३०/०५/२०२१ अन्वये आयुक्त, मनपा, अमरावती यांना कळविले आहे. श्री. प्रविण राठोड, फायरमन यांना पती-पत्नी एकत्रिकरण अंतर्गत बदलीने मनपा नागपुर येथे जाण्यास कार्यमुक्त बदली बाबत सर्वसाधारण सभा नाहरकत/संमती आवश्यक आहे. करीता प्रशासकीय विषय सर्वसाधारण सभेस मंजुरीस्तव सादर करण्यात आला आहे. सदर्हु प्रशासकीय विषयास ही सभा सर्वानुमते मंजुरी प्रदान करीत असून ठराव याच सभेत कायम करण्यात येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर व कायम व पारीत

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका, अमरावती.**

**स्वा/-**
**सभापती तथा महापौर,**
**महानगरपालिका, अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.